॥ भारतीय नागरिकाचा ॥

गायकः आशा भोसले
गीतः ग. दि. माडगूळकर
संगीतः दत्ता डावजेकर
चित्रपटः पाहु रे किती वाट

भारतीय नागरिकाचा
घास रोज अडतो ओठी
सैनिकहो तुमच्यासाठी ॥ धृ. ॥

वावरतो फिरतो आम्ही, नित्यकर्म अवघे करतो
राबतो आपुल्या क्षेत्री, चिमण्यांची पोटें भरतो।
परि आठव येता तुमचा, आतडे तुटतसे पोटी।
सैनिकहो तुमच्यासाठी ॥ १ ॥

आराम विसरलो आम्ही, आळसा मुळी ना थारा
उत्तरेकडुन या इकडे, वार्तासह येतो वारा।
ऐकताच कां अश्रुंची, डोळ्यांत होत असे दाटी?
सैनिकहो तुमच्यासाठी ॥ २ ॥

उगवला दिवस मावळतो, अंधार दाटतो रात्री
माउली निंब फिरवीते, कर अपुलें, थकल्या गात्री।
स्वप्नांत येऊनी चिंता, काळजा दुखविते देठी।
सैनिकहो तुमच्यासाठी ॥ ३ ॥

रक्षिता तुम्ही स्वातंत्रा, प्राणांस घेऊनी हाती
तुमच्यासव अमुची लक्ष्मी, तुमच्यासव शेतीभाती।
एकट्या शिपायासाठी, झुरतांत अंतरें कोटीं।
सैनिकहो तुमच्यासाठी ॥ ४ ॥

निंब फिरवणेः दृष्ट काढणे